नवराष्ट्र नागपूर, 1 सप्टेंबर 2017

QUICK NEWS

# टीसीएस आयटी क्विजचे एडिशन 12 सप्टेंबरला

**नागपूर.** 29 ऑगस्ट 2017 - टाटा कंसलटंसी सर्व्हीसेस (टीसीएस) या अग्रमान्य आयटी सर्व्हीसेस, कंसलटींग आणि बिजनेश सोल्यूशन फर्मच्या वतीने 'टीसीएस आयटी क्विज 2017' च्या नागपूर एडिशनची घोषणा करण्यात आली आहे. या कार्यक्रमाचे आयोजन 12 सप्टेंबर 2017 ला सिव्हील लाईन्स येथील डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात आयोजित करण्यात येणार आहे. आठवी ते 12वी पर्यंतचे विद्यार्थी यामध्ये सहभागी होऊ शकतात. एका शाळेतून दोन विद्यार्थी असलेली एका पेक्षा जास्त टीमही भाग घेऊ शकतात. क्विजसाठी प्रवेश मोफत आहे.

शाळांनी आपला प्रवेश 9 सप्टेंबरपर्यंत किंवा त्यापूर्वी प्रशांत कोपरकर, टीसीएस आयटी विझ समन्वयक, अग्रवाल हाऊस, बुराडे गल्ली, तेलीपुरा, सीताबर्डी, नागपूर येथे नोंदणी करून निश्चित करावा. अधिक माहितीसाठी 9822193655 वर संपर्क साधता येतो. या आयटी क्विजमध्ये आयटी क्षेत्राशी संबंधीत विविध व्यक्ती, अपडेट्स, उपकरण आदींवर प्रश्न विचारण्यात येतील. टीसीएस आयटी क्विज 2017 भारतातील 12 शहरांमध्ये आयोजित करण्यात येईल. यामध्ये अहमदाबाद, बंगळुरू, भुवनेश्वर, चेन्नई, दिल्ली, हैदराबाद, इंदोर, कोची, कोलकाता, मुंबई, नागपूर आणि पुणेचा समावेश आहे. प्रादेशिक फेरीत विजय मिळवलेले संघ डीसेंबरमध्ये होणाऱ्या राष्ट्रीय अंतिम फेरीत मुंबईमध्ये आमोरा-समोर असतील.